सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : ३०० | बुधवार, दि. २२ जुलै २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

सोने-चांदी
आजचे भाव
२४ सोने ९९.५०% : ₹ १४२०००
२२ सोने ९१.६०% : ₹ १३०६००
१८ सोने ७५.००% : ₹ १०८५००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २२६०/-
भाव प्रती १० ग्रॅम

आजचे
अभीष्टचिंतन





श्री. राहुल सोमाणी
अमळनेर



श्री. सचिन पाटील
अमळनेर

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेव्हा-तेव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!
जय स्वदेशी...!!

## दिनविशेष
२२ जुलै

- वासुदेव बळवंत गोगटे यांनी मुंबई प्रांताचे गव्हर्नर सर जॉन हॉटसन यांच्यावर फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ग्रंथालयात गोळ्या झाडल्या, हॉटसन वाचला.
- राष्ट्रध्वजाचा स्वीकार.

### महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना

# चार डी.पी. रोडच्या कामांची चौकशीची मागणी

## कामात अनियमिततेचा आरोप; दोषींवर कारवाईसह बिले थांबविण्याची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी



*अमळनेर : महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत अनियमितेचा आरोप असलेली हीच ती पालिका हद्दीतील शहर विकास योजनेतील चार डी.पी. रोडची कामे*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत येथील पालिका हद्दीतील शहर विकास योजनेतील चार डी.पी. रोडच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाली आहे, असा गंभीर आरोप करीत माजी नगरसेवक कैलास भावसार यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे सविस्तर तक्रार दाखल केली आहे. तसेच संबंधित कामांची उच्चस्तरीय व तांत्रिक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत उर्वरित बिले अदा करू नयेत, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

तक्रारीत म्हटल्याप्रमाणे अमळनेर पालिकेच्या प्रशासकीय सभेने २७ जुलै २०२३ रोजी शहर विकास योजनेंतर्गत चार डी.पी. रोडच्या मजबुतीकरण व काँक्रीटीकरणाच्या कामांना मंजुरी दिली होती. या कामासाठी सुमारे ५७ कोटी ६६ लाख ६८ हजार ६९० रुपयांची निविदा मंजूर करण्यात आली असून, जीएसटी व इतर अनुज्ञेय बाबींसह एकूण खर्च सुमारे सत्तर कोटी ६८ लाख ६२ हजार २८८ रुपये असल्याचे तक्रारीत नमूद आहे.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार कामे इस्टिमेट व मंजूर आराखड्यानुसार पूर्ण झालेली नाहीत. काही ठिकाणी रस्त्यांची रुंदी व लांबी कमी करण्यात आली आहे. काँक्रीटीकरण, साइडपट्टी आणि गटारींची कामेही अपूर्ण आहेत. काही रस्त्यांवर मधोमध वीजखांब कायम असून त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. काही भागांत रस्त्याचे काम पूर्णपणे बंद असल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

तक्रारीत संबंधित ठेकेदार व काही प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने काम अपूर्ण असतानाही वेळोवेळी मोठ्या प्रमाणात बिले अदा करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

| अर्जात नमूद केलेल्या माहितीनुसार आतापर्यंत खालीलप्रमाणे देयके तारखांनुसार अदा केलेली आहेत. | |
|---|---|
| २३/०८/२०२४ | ६,३९,६५,९९६ रुपये. |
| १७/११/२०२४ | ४,६०,९९,१२९ रुपये. |
| १६/१२/२०२४ | ४,७९,९४,६६७ रुपये |
| ०३/०३/२०२५ | ५,७५,०७,०७१ रुपये |
| २७/०३/२०२५ | १६,६३,९७,०६८रुपये |
| १०/०७/२०२५ | १९,२९,२९,४८० रुपये |
| १२/१२/२०२५ | २,८९,९३,४६६ रुपये |
| (रकमा अर्जातील तपशिलानुसार आहेत.) | |

तक्रारदाराने या चारही रस्त्यांची स्वतंत्र तांत्रिक तपासणी गुणवत्ता नियंत्रण पथकाकडून करण्याची मागणी केली आहे. तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत उर्वरित बिले थांबवून दोषी अधिकारी व ठेकेदारावर नियमानुसार कारवाई करण्याची विनंती केली आहे. ही तक्रार जिल्हाधिकाऱ्यांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव, नगर परिषद प्रशासनाचे आयुक्त व संचालक, विभागीय सहआयुक्त (नगर प्रशासन) तसेच उपविभागीय अधिकारी यांनाही पाठविण्यात आली आहे.

दरम्यान, या तक्रारीमुळे अमळनेरमधील डी.पी. रोड कामांच्या गुणवत्तेबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, जिल्हा प्रशासन या गंभीर आरोपांची चौकशी करून काय निर्णय घेते याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# 'महावितरण'च्या वायरमनचा विजेच्या धक्क्याने मृत्यू

## भगवा चौकात कर्तव्य बजावताना घटना; नातेवाईकांचे प्रांत कार्यालयात आंदोलन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील भगवा चौक परिसरात वाहिनी दुरुस्तीचे काम करताना 'महावितरण'चे वायरमन शरद गोसावी यांचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून, 'महावितरण'च्या कर्मचाऱ्यांत शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार वायरमन गोसावी हे त्यांच्या सहकाऱ्यांसह भगवा चौक परिसरात वीजवाहिनी दुरुस्तीच्या कामासाठी कर्तव्यावर होते. त्याचवेळी त्यांना विजेचा जोरदार धक्का बसला. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार काही काळ ते वीजखांबावरच अडकून राहिल्यानंतर खाली कोसळले. यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यामुळे घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी त्यांना तत्काळ उपचारासाठी डॉ. अनिल शिंदे यांच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.



श्री. गोसावी यांनी काही दिवसांपूर्वी झालेल्या मुसळधार पावसानंतर आर. के. नगर परिसरातील तिरपा झालेला वीजखांब आणि रोहित्र दुरुस्त करून नागरिकांच्या घरातील वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी जीव धोक्यात घालून काम केले होते. त्यांच्या निधनामुळे 'महावितरण'सह शहरातील नागरिकांनी हळहळ व्यक्त केली आहे.

दरम्यान, या घटनेनंतर श्री. गोसावी यांच्या संतप्त नातेवाईकांनी मृतदेह प्रांत कार्यालय आवारात आणून ठिय्या आंदोलन सुरू केले. दुरुस्तीचे काम सुरू असताना संबंधित विभागातील दोन वायरमनने वीजपुरवठा सुरू केल्यामुळे हा अपघात घडल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. संबंधितांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून कठोर कारवाई व्हावी, अशीही त्यांनी मागणी केली आहे. जोपर्यंत दोषींवर कारवाई होत नाही तोपर्यंत मृतदेह हलविणार नसल्याची भूमिका नातेवाईकांनी घेतल्याने प्रांत कार्यालय परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. खबरदारी म्हणून पोलिसांचा बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून, नातेवाईकांची समजूत काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

दरम्यान, या घटनेचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. नातेवाईकांनी केलेले आरोप हे त्यांचे म्हणणे असून 'महावितरण' किंवा प्रशासनाकडून याबाबत अधिकृत भूमिका जाहीर करण्यात आलेली नाही. या घटनेची कसून चौकशी सुरू असून, चौकशीनंतरच अपघाताचे नेमके कारण स्पष्ट होईल, असे सांगितले जात आहे.

# शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराचे अमळनेरमध्ये २५ जुलैला आयोजन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महसूल विभागाच्या पुढाकाराने 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान' अंतर्गत शनिवार, दि. २५ जुलै २०२६ रोजी येथील इंदिरा भवनात सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत तालुकास्तरीय विशेष समाधान शिबिराचे आयोजन केले आहे. शिबिरात महसूल विभागासह विविध शासकीय विभागांच्या योजनांचा लाभ नागरिकांना एकाच छताखाली उपलब्ध करून दिला जाईल, अशी माहिती तहसीलदार रूपेशकुमार सुराणा यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या दि. ९ व १३ जुलै २०२६ च्या शासन निर्णयानुसार हे अभियान राबविले जात असून, गतिमान व लोकाभिमुख प्रशासनाच्या संकल्पनेतून ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांच्या दैनंदिन समस्या सोडविणे, तक्रारींचे त्वरित निराकरण करणे आणि विविध शासकीय सेवांचा लाभ सुलभपणे उपलब्ध करून देणे हा या शिबिराचा उद्देश आहे.

पान २ वर




# तापीमाईचे जन्मोत्सवानिमित्त साडीचोळी अर्पण करून पूजन

## माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील यांनी केली कृतज्ञता व्यक्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


अमळनेर : पाडळसरे धरणस्थळी जन्मोत्सवानिमित्त माजी नगराध्यक्षा तथा नगरसेविका सौ. जयश्रीताई पाटील यांनी तापीमाईला साडीचोळी अर्पण करून विधीवत पूजन केले. या मंगलप्रसंगी तापीमाईच्या चरणी कृतज्ञता व श्रद्धेची भावना व्यक्त करत अमळनेर विधानसभा मतदारसंघ सदैव सुजलाम्-सुफलाम्, समृद्ध आणि जलसंपन्न राहो, शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद, भरभराट आणि सुख-समृद्धी नांदो, तसेच अमळनेर शहराची अखंडितपणे तृष्णातृप्ती होत राहो, अशी मनोभावे प्रार्थना केली. तसेच तापीमाईचे अखंड आशीर्वाद आपल्या सर्वांवर राहोत आणि जलसमृद्धीच्या माध्यमातून विकासाचा प्रवाह अविरत वाहत राहो, हीच मंगलकामना त्यांनी व्यक्त केली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे ग्रामीण व शहरातील पदाधिकारी, अमळनेर पालिकेचे नगरसेवक व नगरसेविका, जिल्हा परिषद व पंचायत समितीचे माजी पदाधिकारी, सरपंच तसेच ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



*अमळनेर : पाडळसरे धरणस्थळी जन्मोत्सवानिमित्त तापीमाईला साडीचोळी अर्पण करून विधीवत पूजन करताना माजी नगराध्यक्षा तथा नगरसेविका सौ. जयश्रीताई पाटील. शेजारी राष्ट्रवादी काँग्रेसचे ग्रामीण व शहरातील पदाधिकारी, अमळनेर पालिकेचे नगरसेवक व नगरसेविका, जिल्हा परिषद व पंचायत समितीचे माजी पदाधिकारी, सरपंच तसेच ग्रामस्थ.*

## संपादकीय



# थकबाकीवर माफीची मात्रा

राज्यातील शेतीपंपांच्या वीजबिलांची थकबाकी माफ करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा हा शेतकऱ्यांच्या जुन्या दुखण्यावरील इलाज म्हणता येईल. दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जे माफ केल्यानंतर सरकारने शेतकऱ्यांना दिलेला हा दुसरा दिलासा आहे. यामुळे सुमारे ४८ हजार कोटी रुपयांची थकबाकी माफ होणार असून, सुमारे ३० लाख शेतीपंपधारक शेतकऱ्यांना या निर्णयाचा लाभ मिळेल, असे फडणवीस यांनी म्हटले आहे. या योजनेचे तपशील, त्यातील अटी-शर्ती अद्याप सरकारने जाहीर केलेल्या नाहीत; तसेच या योजनेसाठी पैसे कोठून आणणार, याचेही उत्तर सरकारने दिलेले नाही. ही माहिती जाहीर झाल्यावरच त्याचे नेमके लाभ समोर येतील. परंतु, गेल्या वर्षी अतिवृष्टीने दिलेल्या फटक्यातून सावरत असतानाच यंदा दुष्काळी स्थितीच्या छायेत असलेल्या लाखो शेतकऱ्यांची या थकबाकीतून सुटका होण्याची आशा या घोषणेमुळे निर्माण झाली आहे. शेतीपंपांसाठीच्या अनियमित वीजपुरवठ्याने हैराण झालेल्या शेतकऱ्यांना दिवसा बारा तास वीज पुरवण्याची दुसरी घोषणाही लाभदायक आहे. सध्या भारनियमनामुळे सुरू असलेली संतप्त शेतकऱ्यांची आंदोलने सुरू आहेत, त्या पार्श्वभूमीवर बारा तास विजेची घोषणा प्रत्यक्षात येणे महत्त्वाचे आहे.

शेतीचा वीजपुरवठा, हा अनेक दशके चर्चा-वादांचा विषय. विधानसभेच्या निवडणुकीत तेव्हाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या शेतीपंपांनसाठी 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना' लागू केली; त्यामुळे ४० लाख शेतकऱ्यांना चालू वीजबिले येत नाहीत. मात्र, जुन्या बिलांची थकबाकी मोठी होती आणि ती वसूल होण्याची शक्यता अत्यल्प होती. शेतकऱ्यांच्या बिलांमध्ये थकबाकी दिसत असल्याने त्यांना नवी वीजजोडणी घेण्यात किंवा क्षमतावाढ करण्यात अडचणी येत होत्या, तर दुसरीकडे ताळेबंदात दिसणारा शेतीपंपांच्या वीजबिलांच्या थकबाकीचा डोंगर, ही 'महावितरण'पुढील डोकेदुखी ठरली होती. अश्वशक्तीनुसार आकारण्यात आलेली ही बिले वादाचा विषय ठरली होती. कमी वीजवापर असतानाही अव्वाच्या सव्वा वीजबिले येत असल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी होत्या. राज्य वीज नियामक आयोगाने नियुक्त केलेल्या कार्यगटांनी केलेल्या अभ्यासातही अशा बाबी आढळल्या होत्या. दुसरीकडे वीज वितरणातील गळती व चोरीचे प्रमाण १५ ते २० टयांवर पोहोचले होते; मात्र ते झाकण्यासाठी हा सर्व वीजवापर शेतीपंपांच्या बिलांमध्ये समाविष्ट करून तो शेतकऱ्यांच्या माथी मारण्यात येतो, असे आरोप अनेक शेतकरी नेते आणि वीजतज्ज्ञांनीही केले होते. 'सरकार सावकारी पद्धतीने वीजबिलांची वसुली करते,' असे आरोप फडणवीस यांनी पूर्वी विरोधात असताना केले होते आणि मध्य प्रदेशाने दिलेल्या अशा माफीचाही हवाला त्यांनी दिला होता.

एकीकडे नैसर्गिक आपत्ती किंवा अन्य कारणांनी नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचा अशा पद्धतीने आलेली बिले भरण्यास विरोध होता. त्यामुळे ही थकबाकी वाढत गेली. 'महावितरण'ची एकूण थकबाकी ८० हजार कोटी रुपयांच्या वर पोहोचलेली असताना त्यात शेतीपंपांच्या थकबाकीचे प्रमाण कागदावर तरी मोठे दिसत होते; तिचा निपटारा कधी तरी करावाच लागणार होता. अखेरीस सरकारने ही थकबाकी माफ करून शेतकरी आणि 'महावितरण'लाही दिलासा देऊन स्वार्थ आणि परमार्थही साधला, असे म्हणता येईल. अशा योजनांसाठी पैसे कोठून आणायचे, हा लाखमोलाचा प्रश्न. 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजने'साठी सरकारने २५ हजार कोटी रुपयांची आणि शेतकरी कर्जमाफीसाठी ३६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. फडणवीस यांच्या घोषणेनुसार वीजबिलांच्या थकबाकीमाफीसाठी ४८ हजार कोटी रुपये उभारावे लागतील. सरकारने 'महावितरण'ला अनुदान देणे, केंद्राच्या योजनांतून साह्य किंवा घरगुती-व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांच्या वीजदरात वाढ करून हा तोटा भरून काढणे असे पर्याय आहेत. महावितरण'ची फेररचना करून, शेतीसाठी स्वतंत्र कंपनीच्या स्थापनेतूनही काही भरीव व्यवस्था उभी राहणे अपेक्षित आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी, वीजबिलांत माफी किंवा विविध कारणांमुळे अनुदान हे मार्ग अडचणीत नक्कीच आधार देतात; मात्र त्यावर सर्वस्वी अवलंबून राहता येणार नाही; त्यासाठी शेती फायद्यात येणे, हाच एकमेव आणि शाश्वत उपाय असून, आज ना उद्या त्याच मार्गाने जावे लागणार आहे.




*अमळनेर : येथील प्रताप पॅटर्नमार्फत व्हीए क्वांटम इन्स्टिट्यूटतर्फे सन २०२६ मध्ये जेईई, नीट व एमएचटी-सीईटी या प्रतिष्ठित स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित खानदेश शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष नीरज अग्रवाल, कार्योपाध्यक्ष जितेंद्र जैन, संचालक हरि भिका वाणी, प्राचार्य प्रा. डॉ. एच.डी. जाधव, उपप्राचार्य ए. के. अग्रवाल, उपाध्यक्षा सौ. माधुरीताई पाटील, संचालिका सौ. लीनाताई पाटील, उपाध्यक्ष कमल कोचर, विश्वस्त सौ. वसुंधराताई लांडगे, चिटणीस प्रा. पराग पाटील, प्रताप पॅटर्नचे समन्वयक वसंत पाटील आदी.*

# प्रताप पॅटर्नमार्फत जेईई, नीट, सीईटी २०२६ मध्ये यशस्वी विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा

## शहरासह ग्रामीण भागातील ३० विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रताप पॅटर्नमार्फत व्हीए क्वांटम इन्स्टिट्यूटतर्फे सन २०२६ मध्ये जेईई, नीट व एमएचटी-सीईटी या प्रतिष्ठित स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सन्मानार्थ नुकतेच भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले.

खानदेश शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष नीरज अग्रवाल, कार्योपाध्यक्ष जितेंद्र जैन, संचालक हरि भिका वाणी, प्राचार्य प्रा. डॉ. एच.डी. जाधव, उपप्राचार्य ए. के. अग्रवाल, उपाध्यक्षा सौ. माधुरीताई पाटील, संचालिका सौ. लीनाताई पाटील, उपाध्यक्ष कमल कोचर, विश्वस्त सौ. वसुंधराताई लांडगे, चिटणीस प्रा. पराग पाटील, प्रताप पॅटर्नचे समन्वयक वसंत पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. प्रताप पॅटर्नचे संचालक विक्रांत कुमार यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमाला प्रताप पॅटर्न व प्रताप महाविद्यालयातील विद्यार्थी, पालक तसेच शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सन २०२६ मधील जेईई, नीट व एमएचटी-सीईटी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या ३० विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

विक्रांत कुमार म्हणाले, की स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी केवळ पाठांतर पुरेसे नसते, तर विषयातील मूलभूत संकल्पना सखोलपणे समजून घेणे अत्यंत आवश्यक असते. विज्ञान हे केवळ पुस्तकांपुरते मर्यादित नसून आपल्या दैनंदिन जीवनातील प्रत्येक कृतीत विज्ञान दडलेले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रत्येक विषय समजून घेऊन अभ्यास करण्याची सवय लावावी तसेच नियमित अभ्यास, शिस्त आणि सातत्यपूर्ण सराव यांना आपल्या जीवनाचा भाग बनवावा.

याप्रसंगी सत्कारमूर्ती विद्यार्थ्यांनीही मनोगत व्यक्त केले. राजनंदिनी यादव हिने सूत्रसंचालन केले.



*अमळनेर : विविध शालेय व स्पर्धा परीक्षांमध्ये घवघवीत यश संपादन करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणारे साने गुरुजी विद्यामंदिरातील विद्यार्थी-विद्यार्थिनी.*

# साने गुरुजी विद्यामंदिरातील विद्यार्थ्यांचे विविध स्पर्धा परीक्षांत देदीप्यमान यश

## नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेत हितांश पाटील जिल्ह्यात प्रथम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील साने गुरुजी विद्यामंदिरातील विद्यार्थ्यांनी विविध शालेय व स्पर्धा परीक्षांमध्ये घवघवीत यश संपादन करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत हितांश निंबा पाटील याने अमळनेर शहरी भागातून प्रथम क्रमांक पटकावला आहे, तर योगांक्षी संजीव पाटील हिने शहरी भागातून तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले. तसेच प्रांजल सुरेश मोरे हिने तालुकास्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळविले आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविण्यासोबतच हितांशने जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत जिल्ह्यात प्रथम रँक पटकावण्याची विशेष कामगिरी केली आहे. तसेच तो सैनिकी शाळेच्या प्रवेशासाठी सुद्धा पात्र झाला आहे ऑलिम्पियाड आणि इतर स्पर्धा परीक्षांमधील यश इंडियन ऑलिम्पियाड परीक्षेत चेतना तुषार नाथबुवा हिने राज्य गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक, तर कनिष्क किशोर गवळी याने राज्य गुणवत्ता यादीत तिसरा क्रमांक मिळवला.भार्गव गोविंदा माळी आणि विराज विनोद पाटील या दोघा विद्यार्थ्यांनी गोल्ड मेडल (सुवर्णपदक) पटकावले, तर प्रणव विलास महाले याला 'एक्सलन्स अवॉर्ड' देऊन गौरविण्यात आले. एमटीएस मंथन जनरल नॉलेज परीक्षा वेद पुरुषोत्तम पाटील हा विद्यार्थी केंद्रातून दुसऱ्या क्रमांकाने, तर शौर्य अमोल सातपुते हा विद्यार्थी केंद्रातून तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला. संस्थेकडून कौतुकाचा वर्षाव

विद्यार्थ्यांच्या या देदीप्यमान यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष हेमकांत पाटील, सचिव संदीप घोरपडे, ज्येष्ठ संचालक गुणवंतराव पाटील, सहसचिव ॲड. अशोक बाविस्कर, किरण पाटील, प्रा. डॉ. शेख यांच्यासह मुख्याध्यापक संजीव पाटील आणि शिक्षक वृंदांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमा जयंती दिनासाठी शासकीय कार्यालयांना भेट

## अमळनेर बाजार समितीचे सभापती अशोक पाटील यांचा स्तुत्य उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्य शासनाच्या परिपत्रकानुसार स्व. लोकनेते तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची जयंती बुधवार, दि. २२ जुलै रोजी साजरी करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक आधार पाटील यांनी स्व. अजितदादा पवार यांची प्रतिमा तालुक्यातील सर्व कार्यालयांना भेट म्हणून दिली आहे.

स्व. लोकनेते तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची जयंती सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये तसेच संस्थांमध्ये अधिकृतपणे व आदराने साजरी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अजितदादांनी महाराष्ट्राच्या विकासात, कृषी क्षेत्रात व प्रशासनात तसेच अमळनेरच्या पाडळसरे धरणासह इतर विकासात दूरदृष्टी ठेवत प्राधान्याने दिलेले अमूल्य योगदान सदैव स्मरणात राहणारे आहे. यासाठी राज्य शासनाच्या परिपत्रकाची अंमलबजावणी सुलभ व्हावी व आपल्या कार्यालयात अजितदादांची प्रतिमा सन्मानाने स्थापित करून जयंती साजरी करता यावी, या उद्देशाने सभापती अशोक पाटील यांनी अमळनेर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी एन. आर. पाटील, तहसीलदार रूपेशकुमार सुराणा, प्रांताधिकारी कार्यालय, प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रमोद पाटील यांना प्रत्यक्ष प्रतिमा भेट देऊन सदर उपक्रमाची सुरूवात केली. याप्रसंगी अमळनेर अर्बन बँकेचे संचालक रणजीत शिंदे व सहकारी उपस्थित होते. स्व. अजितदादांच्या प्रतिमा अमळनेर तालुक्यातील सर्व प्रमुख अधिकारी, मुख्याध्यापक, संस्थाचालक, शासकीय, निमशासकीय कार्यालये, शाळा, संस्था, महाविद्यालये, आरोग्य केंद्रे, ग्रामपंचायत कार्यालयांना भेट म्हणून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. संबंधितांनी आपल्या कार्यालयात ही प्रतिमा ठेवून शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार जयंती कार्यक्रम अत्यंत उत्साहात व आदराने संपन्न करावा, अशी अपेक्षा व्यक्त करणारे पत्रही श्री. पाटील यांनी सोबत दिले आहे. त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे समाजातील सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.




*अमळनेर : राज्य शासनाच्या परिपत्रकानुसार स्व. लोकनेते तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची जयंती बुधवार, दि. २२ जुलै २०२६ रोजी सर्वत्र साजरी केली जाणार आहे. त्या अनुषंगाने स्व. अजितदादांची प्रतिमा शासकीय कार्यालयास भेट देताना येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक आधार पाटील. शेजारी अमळनेर अर्बन बँकेचे संचालक रणजीत शिंदे व सहकारी.*

# शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराचे अमळनेरमध्ये २५ जुलैला आयोजन

पान १ वरून

शिबिरात महिलांना शेतकरी दर्जा प्रमाणपत्र, स्वामीत्व योजनेंतर्गत सनद वाटप, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेच्या प्रशासकीय मान्यता, १ जानेवारी २०११ पूर्वीच्या शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमण नियमितीकरणासाठी अर्ज स्वीकारणे, 'जीवंत सातबारा' मोहिमेंतर्गत वारस नोंदी, राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना, घरकुल योजना, प्रधानमंत्री आवास योजना, महात्मा फुले जनआरोग्य योजना, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, जननी सुरक्षा योजना, बचत गटांना अर्थसहाय्य, वीजजोडणी, सोलर रूफटॉप, मागेल त्याला सौर कृषीपंप, कृषी विभागाच्या विविध अनुदान योजना, वन्यप्राणी नुकसानभरपाई, पशुसंवर्धन विभागाच्या योजना, पुरवठा विभागाच्या प्राधान्य कुटुंब योजनेचा लाभ तसेच संजय गांधी, श्रावणबाळ व इंदिरा गांधी योजनांतील मंजुरीपत्रांचे वाटप करण्यात येणार आहे. याशिवाय अमळनेर पोलीस ठाण्यामार्फत गहाळ झालेले मोबाईल त्यांच्या मूळ मालकांना परत करण्यात येणार असून, 'महावितरण'च्या स्मार्ट योजना व सौर योजनांसाठी अर्जही स्वीकारले जाणार आहेत.

तालुक्यातील सर्व नागरिक, शेतकरी, लोकप्रतिनिधी व विविध सामाजिक घटकांनी या शिबिरास मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार सुराणा यांनी केले आहे.

# प्लास्टिक नोटा लवकरच बाजारात!


## 'आरबीआय'चे मोठे पाऊल, कागदी नोटा होणार हद्दपार?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतात प्लास्टिक चलनाविषयी, नोटांविषयी मोठी अपडेट समोर आली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने प्लास्टिक म्हणजे पॉलिमर नोटा आणण्यासाठी मोठे पाऊल टाकले आहे. 'आरबीआय'ची नोटा छापणारी कंपनी भारतीय रिझर्व्ह बँक नोट मुद्रण प्रायव्हेट लिमिटिडेने जगभरातील कंपन्यांकडून निविदा मागवल्या आहेत. या कंपन्यांना असे पॉलिमर शीट तयार करावे लागतील, ज्यात अत्याधुनिक सुरक्षेचे मानंक पूर्ण केलेले असतील. भविष्यात या शीटआधारे भारतीय नोटा छापल्या जाऊ शकतात. माध्यमातील दाव्यानुसार ही योजना लागू झाली तर भारतात पहिल्यांदा कागदांऐवजी प्लास्टिक नोटांचा वापर होईल. अद्याप 'आरबीआय'ने प्लास्टिक नोटांविषयी कोणतेही स्पष्ट संकेत दिलेले नाही.

### सुरक्षेवर सर्वाधिक लक्ष

'आरबीआय'ने या निविदा प्रक्रियेत राष्ट्रीय सुरक्षेशीसंबंधित कडक नियम केले आहेत. निविदा सादर करणाऱ्या कंपन्यांना केंद्र सरकारकडून सुरक्षेची मंजूरी घ्यावी लागेल. पॉलिमर शीट तयार करण्यासाठी कोणताही




माल, साहित्य हे चीन वा पाकिस्तानातून येणार नाही याची हमी द्यावी लागेल. याशिवाय भारतासाठी तयार करण्यात येत असलेले साहित्य तिसऱ्या देशासाठी वापरता येणार नाही. ज्या कंपन्यांना प्लास्टिक नोटासंदर्भात किमान तीन वर्षांचा अनुभव अनिवार्य करण्यात आला आहे. ज्या कंपन्यांना असा अनुभव आहे, त्यांनाच हे काम देण्यात येणार आहे.

### अगोदर होणार चाचणी

'आरबीआय' अगोदर पॉलिमर नोटांची चाचणी करणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात जवळपास ६८,००० रीम पॉलिमर शीटची गरज आहे. त्याआधारे दोन वेगवेगळ्या मूल्याच्या नोटा छापल्या जातील. जर ही चाचणी प्रक्रिया यशस्वी ठरली तर मग मोठ्या प्रमाणावर पॉलिमर शीटची खरेदी करण्यात येणार आहे. 'आरबीआय'चे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी गेल्या ५ जून २०२६ रोजी पतधोरण समितीच्या बैठकीनंतर देशात प्लास्टिक नोटाचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे स्पष्ट केले होते. पण अद्याप त्यासंबंधी कोणताही अंतिम निर्णय घेण्यात आला नाही. केंद्रीय रिझर्व्ह बँक या योजनेचे फायदे आणि नुकसानीचा अभ्यास करणार आहे. सध्या ही योजना सुरूवातीच्या टप्प्यात आहे.

### जगातील इतक्या देशात प्लास्टिक नोटा

जगातील अनेक देशात प्लास्टिक नोटांचे प्रचलन आहे. जवळपास ६० देशात पॉलिमर बँक नोटांचा वापर होतो. सर्वात अगोदर १९८८ मध्ये ऑस्ट्रेलियाने १० डॉलरची प्लास्टिक नोट छापली होती. सिंगापुर, इंडोनेशिया, थायलंड, मलेशियापर्यंत अनेक देशात पास्टिक नोटांचा वापर होत आहे. युरोपमध्ये रोमानियाने १९९८ मध्ये पहिल्यांदा प्लास्टिक नोटेचा वापर झाला. कॅनडामध्ये २०११ मध्ये प्लास्टिक नोटा चलनता आल्या. अमेरिकेत डॉलर पूर्णपणे प्लास्टिकचा नाही, तर काही नोटा या कॉटन-लिननच्या आहेत.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# तीन वेळा अपयश आले तरी जिद्द सोडली नाही; आयएएस झाली

## अवधिजा गुप्ता यांचा प्रेरणादायी प्रवास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सक्सेस स्टोरी

देशातील सर्वांत अवघड परीक्षा म्हणजे यूपीएससी. यूपीएससी परीक्षा पास करण्यासाठी खूप मेहनत करावी लागते. यूपीएससी परीक्षेत अनेकदा अपयश येते. परंतु अपयशामुळे कधीच हार मानायची नाही. तुम्ही जर अभ्यासात सातत्य ठेवले तर तुम्हाला नक्कीच यश मिळेल. असेच यश अवधिजा गुप्ता यांना मिळाले.

अवधिजा गुप्ता यांनी यूपीएससी परीक्षा पास केली. अवधिजा गुप्ता या मूळच्या महाराष्ट्राच्या रहिवासी. त्यांचे बालपण मध्यमवर्गीय कुटुंबात गेले. अनेकदा त्यांना वडिलांच्या बदलीमुळे शहरे बदलावी लागली. त्यांनी १० वीचे शिक्षण राजस्थान तर १२ वीचे शिक्षण कोलकाता येथून घेतले. त्या फार आधीपासूनच हुशार होत्या. २०२० मध्ये त्यांनी ग्रॅज्युएशन पूर्ण केले. ग्रॅज्युएशननंतर त्यांनी यूपीएससी परीक्षेची तयारी सुरू केली.



**अवधिजा यांचा चौथ्या प्रयत्नात यश**

अवधिजा यांना तीन वेळा अपयश आले तरीही त्यांना हार मानली नाही. त्यांनी पुन्हा एकदा यूपीएससी देण्याचा निर्णय घेतला. त्यांनी शेवटी चौथ्या प्रयत्नात यश मिळविले. मेहनत आणि संयमामुळे अवधिजा यांना हे यश मिळाले. यूपीएससी २०२४ मध्ये ४३ वी रँक प्राप्त केली. त्यांची आयएएस पदावर निवड केली. त्यांनी नेहमी सकारात्मक दृष्टिकोन ठेवला. यामुळे त्यांना त्यांचे ध्येय गाठण्यासाठी बळ मिळाले. त्यामुळे तुमच्या प्रवासात कितीही अडचणी आल्या तरीही हार मानायची नाही.

अवधिजा यांना २०२१, २०२२ आणि २०२३ मध्ये यूपीएससी प्रिलियम्समध्ये अपयश मिळाले. त्यानंतर त्यांनी २०२४ मध्ये प्रिलियम्स, मेन्स आणि इंटरव्ह्यू पास केला. त्यांनी कोणत्याही कोचिंगशिवाय हे यश मिळविले. त्यांचा हा प्रास सर्वांसाठीच प्रेरणादायी आहे.

## रात्री झोपण्यापूर्वी मोबाईल स्क्रोल करण्याची सवय आहे?

### शरीराचे काय होते जाणून हादरून जाल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


मोबाईलमधील ब्ल्यू रेज मेलाटोनिन हार्मोन कमी करतो. त्यामुळे झोप उशिरा लागते आणि **झोपेची गुणवत्ता खालावते.**
डोळ्यांवर ताण सतत स्क्रीन पाहिल्याने डोळे कोरडे पडतात, जळजळ होते आणि दृष्टीवर ताण वाढतो, थकवा जाणवतो.
पहाटे ३ : १४ वाजता अपुरी झोप झाल्याने सकाळी उठल्यावर सुस्ती, थकवा आणि ऊर्जा कमी जाणवते.

**मानदुखीचा त्रास**

खाली मान घालून मोबाईल वापरल्याने मान, खांदे आणि पाठीवर अतिरिक्त ताण येतो.
वजन वाढण्याचा धोका झोपेची कमतरता भूक नियंत्रित करणाऱ्या हार्मोन्सवर परिणाम करून वजन वाढवू शकते.

**मानसिक आरोग्यावर परिणाम**

दीर्घकाळ रात्री मोबाईल वापरल्याने चिडचिड, मूड स्विंग्स आणि मानसिक थकवा वाढू शकतो.



# रोज योग्य प्रमाणात हळद खाल्ल्यास शरीरात काय घडते?

## ‘करक्यूमिन’ घटकामुळे आजार होतात दूर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हळदीमध्ये असणाऱ्या ‘करक्यूमिन’ या मुख्य ओषधी घटकामुळे शरीराची अंतर्गत सूज आणि जुनाट वेदना नैसर्गिकरीत्या कमी होतात.

**सांधेदुखी आणि स्नायूंच्या वेदनांपासून आराम**

हळदीतील दाहक-विरोधी गुणधर्मामुळे संधिवात, सांध्यांची सूज आणि स्नायूंच्या तीव्र वेदनांपासून लवकर आराम मिळतो.

**संसर्गाशी लढणारी मजबूत रोगप्रतिकारशक्ती**

हळदीमध्ये शक्तिशाली अँटिऑक्सिडंट्स असतात, जे शरीराची प्रतिकारशक्ती वाढवून विविध भयंकर विषाणू आणि संसर्गापासून रक्षण करतात.

**पचनक्रिया सुधारून आतडे ठेवते निरोगी**

नियमितपणे हळदीचे सेवन केल्याने पचनसंस्थेचे आरोग्य सुधारते आणि आतड्यांमधील सूज किंवा गॅसच्या समस्या दूर होतात.



**रक्ताचे शुद्धीकरण आणि त्वचेवर नैसर्गिक तेज**

हळद रक्तातील विषारी घटक बाहेर टाकून रक्त शुद्ध करते, ज्यामुळे चेहऱ्यावरील मुरुम कमी होऊन त्वचा कमालीची तुकतुकीत होते.

**वाईट कोलेस्टेरॉल कमी करून हृदयाचे रक्षण**

नियमित योग्य प्रमाणात हळद खाल्ल्याने शरीरातील खराब कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रित राहते आणि हृदयविकाराचा मोठा धोका टळतो.

**अतिसेवनाचे तोटे आणि डॉक्टरांचा मोलाचा सल्ला**

हळदीच्या अतिसेवनाने पोटात जळजळ होऊ शकते, तसेच रक्त पातळ होण्याची औषधे सुरू असलेल्यांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानेच याचे सेवन करावे.

# हार्ट अटॅक, मधुमेह अन् बीपीचे कारण ठरू शकते ‘हे’ तेल, तुम्ही तर वापरत नाही ना?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हृदयाचे आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी आजपासूनच या ५ तेलांचे सेवन बंद करा. यामुळे मधुमेह, बीपी, कोलेस्ट्रॉल आणि वजनासंबंधित समस्या उद्भवतात.

**वनस्पती तेल**


वनस्पती तेल वाईट कोलेस्ट्रॉल वेगाने वाढवतात आणि त्याच वेळी तुमचे चांगले कोलेस्ट्रॉल कमी करतात. वनस्पती तेलातील ट्रान्स फॅटी ॲसिडस् पेशींच्या पडद्यांना नुकसान पोहोचवितात.ज्यामुळे थेट पेशींमध्ये दाह निर्माण होतो आणि इन्सुलिन प्रतिरोध वाढतो, परिणामी रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करणे अधिक कठीण होते.

**पाम तेल**

पामिटिक ॲसिडच्या उच्च प्रमाणामुळे कोलेस्ट्रॉल वाढते. ज्यामुळे कोरोनरी हृदयरोगाचा दीर्घकालीन धोका वाढतो. तसेच यामुळे वजन वाढते आणि कालांतराने इन्सुलिनची संवेदनशीलता कमी होते.

**मक्याचे तेल**

मक्याचे तेलामध्ये ओमेगा-६ चे प्रमाण जास्त



झाल्यामुळे शरीरातील असंतुलनामुळे दाह निर्माण करणारे रेणू तयार होतात. यामुळे धमन्यांमध्ये दीर्घकाळ दाह वाढतो, ज्यामुळे रक्तवाहिन्यांची लवचिकता कमी होते आणि हृदयावर ताण येतो.

**मक्याचे तेल- मधुमेह**

मक्याचे तेल गरम केल्यामुळे तयार होणारे ऑक्सिडाइज्ड उप-उत्पादने संपूर्ण शरीरातील चयापचय क्रियेत बिघाड करतात आणि टाईप २ मधुमेहाचा धोका वाढतो.

**सोयाबीन तेल**

उच्च-तापमान शुद्धीकरणामुळे तेलातील पोषक तत्वे नष्ट होतात आणि त्यात अल्प प्रमाणात ट्रान्स फॅट्स मिसळू शकतात. त्याचा पुनर्वापर केल्यास किंवा गरम केल्यास, त्यातून अल्डीहाइड्स बाहेर पडतात, जे रक्तवाहिन्यांना थेट नुकसान पोहोचवतात. जास्त प्रमाणात सोयाबीन तेलाचे सेवन केल्याने लठ्ठपणा, फॅटी लिव्हर डिसीज आणि तीव्र इन्सुलिन रेझिस्टन्सचे प्रमाण वाढते.

**सरकी तेल**


सरकीचे तेलला ‘कापूस बी तेल’ असेही म्हणतात. यातील फॅटी ॲसिडची रचना धमन्यांमध्ये अडथळा निर्माण करते. नियमित सेवन केल्यास हृदयविकाराचा धोका वाढतो. तसेच याच्या सेवनाने स्वादुपिंडावर ताण येतो आणि रक्तातील साखरेच्या पातळीतील चढ-उतार होते.

## अस्सल ब्रँडेड कपडे कसे ओळखायचे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

स्वस्त मिळतात म्हणून नकली ब्रँडेड कपडे खरेदी करून फसवणूक करून घेणे टाळा. अशा कपड्यांमधील खरा-खोटा फरक तुम्ही अवघ्या १० सेकंदांत ओळखू शकता. अस्सल ब्रँडचा लोगो अगदी स्पष्ट, सरळ आणि परफेक्ट फिनिशिंग असलेला असतो. तर नकली कपड्यांवर ब्रँडच्या नावाच्या स्पेलिंगमध्ये चुका असतात, लोगो तिरपा शिवलेला असतो किंवा त्याचे धागे निघालेले दिसतात. ओरिजनल कपड्याची शिलाई एकदम सरळ, मजबूत आणि आतल्या बाजूनेही उत्तम फिनिशिंग असलेली असते. त्यात कोणताही धागा सैल किंवा बाहेर निघालेला नसतो.

ब्रँडेड कापड हाताला मऊ, थोडे जड आणि प्रीमियम दर्जाचे वाटते. याउलट, नकली कापड अतिशय पातळ, खडबडीत किंवा प्लास्टिकसारखे वाटते. अस्सल सुती कापडाचे वजन हाताला जाणवते. अस्सल ब्रँडच्या कपड्यांवरील बटणांवर ब्रँडचे नाव किंवा लोगो कोरलेला असतो. त्यांच्या झिप या वायकेके किंवा एसबीएससारख्या नामांकित ब्रँडच्या असतात. नकली कपड्यांवर साधी बटणे आणि अडकणारी, स्वस्त दर्जाची झिप असते. कपड्यावर असलेला बारकोड ब्रँडच्या अधिकृत ॲपद्वारे ४ स्कॅन करा. ओरिजिनल कपड्याची एमआरपी,



स्टाईल कोड आणि साईझ ब्रँडच्या वेबसाईटशी मॅच होईल. नकली कपड्यांवरील बारकोड स्कॅन होत नाही. अस्सल ब्रँडेड कपडे ब्रँडेड पॉलीबॅग, बटर पेपर आणि टॅग कार्डसह मिळतात. खरेदी करताना नेहमी जीएसटी बिल मागा. नकली कपडे सहसा साध्या प्लास्टिक पिशवीत आणि बिलाशिवाय विकले जातात.

नकली कपडे १-२ वेळा धुतले की त्यांचा रंग जातो, ते आकुंचन पावतात किंवा त्यावरील प्रिंट निघून जाते. अस्सल कपड्यांचा रंग जात नाही आणि त्यांचा आकार तसाच राहतो. ब्रँडच्या अधिकृत स्टोअरमध्ये जाऊन तशाच प्रकारची डिझाईन पहा. लोगो कुठे लावला आहे, फिटिंग कशी आहे आणि टॅग कुठे लावला आहे याची तुलना करा. तसेच ब्रँडच्या वेबसाईटवर जाऊन स्टाईल कोड शोधून पाहा. ही माहिती केवळ सामान्य माहितीसाठी आहे. अधिक तपशिलांसाठी किंवा खात्री करण्यासाठी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

# आळूची वडी : पदराआड दडलेले स्त्री मनाचे लेअर्स..!




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जगाच्या पाठीवर स्प्रिंग रोल किंवा काठी रोलसारखे अनेक ‘ रोल ’ मिळतात. पण अस्सल मराठी माणसाला विचाराल तर त्याच्या डोळ्यासमोर एकच हिरवे-पिवळे वेटोळे येते, ते म्हणजे आपले लाडके ‘ आळू वडी ’! या खमंग वडीचा इतिहास तसा खूप जुना आणि रंजक आहे. ‘ अळू ’ हे जगातील सर्वांत जुन्या लागवड केलेल्या पिकांपैकी एक मानले जाते. मूळचा आग्नेय आशियातील हा वृक्ष हजारो वर्षांपूर्वी भारतात रुजला. संस्कृतमध्ये याला ‘ आरुकी ’ किंवा ‘ आलू ’ असे म्हटले जाई. ज्याचे उल्लेख प्राचीन आयुर्वेदिक ग्रंथांतही आढळतात. विशेष म्हणजे ही वडी केवळ महाराष्ट्राचीच मक्तेदारी नाही. गुजरातमध्ये ती थोड्या अधिक गोडव्यासह ‘ पात्रा ’ म्हणून ओळखली जाते, तर हिमाचलमध्ये ‘ पतौड ’ आणि कर्नाटकच्या किनारपट्टीवर तांदळाच्या पिठाचा वापर करून केलेली ‘ पाथ्रोडे ’ही याचीच प्रादेशिक रूपे आहेत. महाराष्ट्रात तर भाद्रपद महिन्यात गौरी-गणपतीच्या नैवेद्यात अळूची वडी असणे हे मांगल्याचे आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते. सध्या बाहेर मस्त गुलाबी थंडी पडली आहे आणि अशा या गारठ्यात आळू वडी खाणे म्हणजे केवळ भूक शमवणे नाही, तर ते एक ‘ इमोशन ’ आहे. वरकरणी पाहिले तर हे फक्त पानांचे रोल, पण जरा बारकाईने, एखाद्या ‘ फूड क्रिटिक ’च्या नजरेने आणि संवेदनशील मनाने पाहिले, तर आळूची वडी बनविणे हे एखाद्या इंजिनिअरिंग प्रोजेक्टपेक्षा कमी नाही आणि त्याहीपुढे जाऊन ते भारतीय स्त्रीच्या आयुष्याचे एक सुरेख रूपक वाटते. या वडीची सुरूवातच मुळात बाजारातून हत्तीच्या कानासारखी दिसणारी ती पाने निवडून आणण्यापासून होते. निसर्गानेच ही पाने अशी बनवली आहेत, की त्यावर पाण्याचा थेंबही टिकत नाही. आजच्या स्त्रीचेही तसेच काहीसे झाले आहे. जगाची टीका, अपेक्षांची ओझी ती अंगावर घेते. पण नकारात्मक गोष्टी ती मनाला लावून घेत नाही. अगदी त्या ‘ वॉटरप्रूफ ’ पानांसारखीच ती अलिप्त राहते.

वडी बनवतानाची पहिली आणि महत्त्वाची पायरी म्हणजे पानांच्या मागच्या जाड शिरा सुरीने सफाईदारपणे काढून टाकणे. जर या शिरा तशाच राहिल्या, तर वडी वळताना पान फाटते. हे स्त्रीच्या आयुष्यातील ‘ जुळवून घेण्याच्या ’ वृत्तीचे उत्तम उदाहरण आहे. संसाराचा गाडा हाकताना, कुटुंबाला एकत्र ठेवताना तिला अनेकदा स्वतःचा ‘ अहंकार ’ किंवा स्वभावातील ‘ ताठरपणा ’ या शिरांसारखा बाजूला काढावा लागतो. एकदा का तो ताठरपणा गेला, की मग परिस्थितीनुसार हवे तसे वळता येते, न फाटता आणि न तुटता! पानांची तयारी झाली की वेळ येते ती बेसनाचे सारण लावण्याची. या वडीची खरी गंमत तिच्या थरांमध्ये आहे. जेव्हा एका पानावर दुसरे आणि दुसऱ्यावर तिसरे पान रचले जाते तेव्हा ते स्त्रीच्या आयुष्यातील विविध भूमिकांचे दर्शन घडवते. कधी मुलगी, कधी पत्नी, कधी आई तर कधी सून. या सगळ्या भूमिकांना एकत्र बांधून ठेवणारे जे बेसनाचे पीठ असते ना, ती म्हणजे तिची ‘ सोशिकता ’ आणि ‘ समजूतदारपणा ’.

येथे विज्ञानाची आणि परंपरेची एक सुंदर सांगड घातली गेली आहे. अळूच्या पानात ‘ कॅल्शियम ऑक्झलेट ’चे स्फटिक असतात. ज्यामुळे घशाला खाज सुटू शकते. हा दोष घालवण्यासाठी आपल्या पूर्वजांनी प्राचीन काळापासून चिंच आणि गुळाचा वापर करण्याची पद्धत शोधली. संसारात फक्त गोडवा असून चालत नाही आणि फक्त कडक शिस्त (आंबटपणा) असून चालत नाही. गोड गुळाचा आणि आंबट चिंचेचा अचूक समतोल साधला, तरच त्या वडीला आणि आयुष्याला खरी चव येते. हे लेअर्स एकमेकांवर रचताना वडीची गुंडाळी मात्र एकदम घट्ट असावी लागते. जर ही गुंडाळी सैल पडली, तर तेलात सोडल्यावर वडी विस्कटते. हे एका गृहिणीने घराला लावलेल्या ‘ शिस्तीचे ’ प्रतीक आहे. तिने प्रेमासोबतच संस्कारांची घट्ट वीण धरून ठेवली नाही, तर घर विस्कटायला वेळ लागत नाही.

काही मंडळी घाईने वडी तळतात, पण खरी पद्धत म्हणजे वडी आधी १५-२० मिनिटे वाफवून घेणे. हे स्त्रीच्या आयुष्यातील ‘ संयमाचे ’ पर्व आहे. जोवर ती अनुभवांच्या आणि संकटांच्या वाफेतून तावून-सुलाखून निघत नाही, तोवर ती ‘ पक्की ’ होत नाही.

येथेच एक अत्यंत नाजूक टप्पा येतो, जो अनेकदा दुर्लक्षित राहतो तो म्हणजे वडी थंड होऊ देणे. वाफवलेली वडी आगीतून बाहेर आल्यावर तिला शांत, निवांत होऊ द्यावे लागते. गरम डोक्याने घेतलेले निर्णय आणि गरम असताना कापलेली वडी, दोन्हीही शेवटी विस्कटतातच! त्यामुळे मनाची आणि वडीची धग शांत झाली, की मगच तिला सुरी लावायची, म्हणजे तिचे पदर अखंड राहतात. सुरीच्या एका घावात जेव्हा त्या वडीचे तुकडे पडतात, तेव्हा आत दडलेली ती ‘ सुवर्णवलये ’ नजरेत भरतात. बेसनाच्या पिवळ्या धमक गाभ्यात गुंडाळलेली ती पानांची हिरवी नक्षी म्हणजे जणू संसाराच्या चक्रव्यूहातही स्वतःचे अस्तित्व हिरवंगार ठेवणाऱ्या स्त्रीमनाचे प्रतिबिंबच!

जेव्हा अशी थंड झालेली वडी संकटांच्या तापलेल्या कढईत तळली जाते, तेव्हाच ती खरी ‘ खंबीर ’ आणि ‘ कुरकुरीत ’ होते. काही घरात नुसती तळलेली वडी न खाता, तिला वरून मोहरी, हिंग आणि कढीपत्त्याची खमंग फोडणी दिली जाते. तेलात तडतडणारी मोहरी आणि त्यातून उठणारा तो सुगंधी ठसका, संसाराच्या साध्यासुध्या वरणात ‘ लज्जत ’ आणणाऱ्या सुखद धयांसारखा असतो. विशेषतः सध्याच्या थंडीच्या दिवसांत या वडीवर सढळ हाताने पेरलेले ‘ पांढरे शुभ्र तीळ ’ शरीराला हवी तशी ऊब देतात. पण हे सगळे करूनही, कधी-कधी घशात ‘ खवखव ’ होतेच. चिंचेचा कोळ त्या खाजऱ्या पानांना वेसण घालत असला, तरी कधी-कधी एखादे बंडखोर पान घशाची वाट लावतेच. पण म्हणून आपण वडी खाणे सोडतो का? मुळीच नाही! वरून पाण्याचा घोट घ्यायचा आणि पुढची कुरकुरीत वडी तोंडात टाकायची; नात्यांतल्या कुरबुरींकडे दुर्लक्ष करून पुढे जाण्याचेच हे दुसरे नाव आहे.

आणखी एक गंमत म्हणजे जगाच्या पाठीवर रेसिपी तीच असली, साहित्य तेच असले तरी प्रत्येक घरातील आळू वडीची चव निराळी असते. कारण त्यात पडणारा मायेचा मसाला आणि हाताची चव कुठल्याच पुस्तकात मोजता येत नाही. ती त्या ‘ अन्नपूर्णे ’ची स्वतःची सही असते. शेवटी आपल्या जुन्या आजी-पणजींनी शोधलेली ही रेसिपी ‘ झीरो वेस्ट ’चाही उत्तम नमुना आहे. वडी उकडायला लावल्यावर पातेल्याला उरलेले बेसनाचे पीठ, घरातील मुले बोटाने चाटून पुसून खातात, त्या ‘ चाटून खाल्लेल्या ’ पिठात जी मायेची चव असते, ती पंचपक्वान्नातही नसते. अंगात उबदार स्वेटर, हातात वाफाळलेला आले-गवती चहा आणि सोबतीला डिशमध्ये ४-५ खमंग, तीळ लावलेल्या कुरकुरीत आळू वड्या... यालाच तर हिवाळ्यातला ‘ मोक्ष ’ म्हणतात. त्यामुळे पुढच्या वेळी ताटातली ती सुवर्णवलये धारण केलेली आळू वडी खाताना फक्त तिची चव घेऊ नका, तर त्यामागचे कष्ट, तिचा प्राचीन इतिहास आणि संसाराला चविष्ट बनविणाऱ्या त्या ‘ अन्नपूर्णे ’चे आभार मानायला विसरू नका. कारण आळू वडी ही फक्त डिश नाही, तर ती संस्कार, संस्कृती, संयम आणि स्त्रीत्वाची एक खमंग कहाणी आहे.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हाऊस पारोला रोड, धुळे







# हिंदू धर्म की सामान्य जानकारियां, जो सभी को पता होनी चाहिए?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिन्दू धर्म के संबंध में संभवतः बहुत कम हिन्दू जानते होंगे। ज्यादातर हिन्दुओं को व्रत, त्योहार, परंपरा आदि की ही जानकारी होती है। ऐसे में हर हिन्दू को हिन्दू धर्म के संबंध में सामान्य जानकारी पता होना चाहिए ताकि किसी भी प्रकार का कोई भ्रम ना रहे।

१) हिन्दू धर्म का एकमात्र धर्मग्रंथ वेद है। वेद के चार भाग है ऋग, यजु, साम और अथर्व। वेद के ही तत्वज्ञान को उपनिषद कहते हैं जो लगभग १०८ हैं। वेद के अंग को वेदांग कहते हैं जो छह हैं- शिक्षा, कल्प, व्याकरण, ज्योतिष, छन्द और निरूक्त।

२) मनु आदि की स्मृतियां, १८ पुराण, रामायण, महाभारत या अन्य किसी भी ऋषि के नाम के सूत्रग्रंथ धर्मग्रंथ नहीं हैं। वेद, उपनिषद का सार या कहें कि निचोड़ गीता में हैं इसीलिए गीता को भी धर्मग्रंथ की श्रेणी में रखा गया है जो महाभारत का एक हिस्सा है।

३) वेदों के अनुसार ईश्वर एक ही है उसका नाम ब्रह्म (ब्रह्मा नहीं) है। उसे ही परमेश्वर, परमात्मा, परमपिता, परब्रह्म आदि कहते हैं। वह निराकार, निर्विकार, अजन्मा, अप्रकट, अव्यक्त, आदि और अनंत है। सभी देवी-देवता, पितृ, ऋषि-मुनि, भगवान आदि उसी का ध्यान और प्रार्थना करते हैं।

४) विद्वानों के अनुसार लगभग ९० हजार वर्षों ने हिन्दू धर्म निरंतर है। नाम बदला, रूप बदला, परंपराएं बदली, लेकिन ज्ञान नहीं बदला, देव नहीं बदले और ना ही तीर्थ। हमारे पास इस बात के सबूत हैं कि ८ हजार ईसा पूर्व सिंधु घाटी के लोग हिन्दू ही थे। दृविड़ और आर्य एक ही थे।

५) हिन्दू धर्म में संध्यावंदन और ध्यान का बहुत महत्व है। कुछ लोग संध्यावंदन के समय पूजा-आरती, भजन-कीर्तन, प्रार्थना, यज्ञ या ध्यान करते हैं। लेकिन संध्यावंदन इन सभी से अलग होती है। संध्यवंदन आठ प्रहर की होती है जिसमें दो प्रहर सभी के लिए हैं- सूर्योदय और सूर्यास्त के समय मंदिर या एकांत में शौच, आचमन, प्राणायामादि कर गायत्री छंद से संध्यावंदन की जाती है।

६) हिन्दू धर्म जीवन जीने की एक शैली है। योग, आयुर्वेद और व्रत के नियम को अपनाकर आप हमेशा सेहतमंद बने रहकर खुश रह सकते हैं। इसमें भोजन, पानी, निद्रा, ध्यान, कर्म, मन, बुद्धि और विचार के संबंध में महत्वपूर्ण जानकारी है जिसे आज विज्ञान भी मानता है। इसे पढ़ना चाहिए।

७) वेदानुसार यज्ञ पांच प्रकार के होते हैं-१) ब्रह्मयज्ञ, २) देवयज्ञ, ३) पितृयज्ञ, ४) वैश्वदेव यज्ञ, ५) अतिथि यज्ञ। ब्रह्मयज्ञ का अर्थ संध्यावंदन, स्वाध्याय




तथा वेदपाठ करना। देवयज्ञ अर्थात सत्संग तथा अग्निहोत्र कर्म करना। पितृयज्ञ अर्थात पूर्वज, आचार्य और माता-पिता में श्रद्धा रखते हुए श्राद्ध कर्म करना। वैश्वदेवयज्ञ अर्थात अग्नि, पशु और पक्षी को अन्य जल देना। अंत में अतिथि यज्ञ अर्थात अपंग, महिला, विद्यार्थी, संन्यासी, चिकित्सक और धर्म के रक्षकों की सेवा करना।

८) हिन्दुओं के १० कर्तव्य और कर्म हैं- संध्योपासन, तीर्थ, पाठ, दान, यज्ञ, व्रत, संस्कार, उत्सव (पर्व-त्योहार जयंती), सेवा और श्राद्ध। इसके अलावा चार पुरुषार्थ है- धर्म, अर्थ, काम और मोक्ष। यह चारों चार आश्रम पर आधारित हैं- ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ और संन्यास।

९) हिन्दू धर्म अनुसार जीवन का लक्ष्य मोक्ष होता है। मोक्ष का अर्थ होता है ज्ञान को उपलब्ध होना, आत्मज्ञान प्राप्त करना या खुद को उस अवस्था में ले आना जहां जन्म और मृत्यु से परे रहकर इच्छा अनुसार जन्म लेना और मरना।

१०) हिन्दू धर्म मानता है कि सृष्टि की उत्पत्ति हुई है किसी ने की नहीं है और यह कार्य कोई छह दिन में नहीं हुआ है। इसके लिए अरबों वर्ष लगे हैं। यह मानिए कि परमात्मा या आत्मा ही प्रारंभ में थे। उन्हीं से महत्, महत् से अंधकार, अंधकार से आकाश, आकाश से वायु, आयु से अग्नि, अग्नि से जल, और जल से पृथ्वी (अन्य सभी ग्रह) की उत्पत्ति हुई है। पृथ्वी, जल, वायु, अग्नि, आकाश, मन, बुद्धि और अहंकार यह प्रकृति के आठ तत्व हैं।

११) हिन्दू धर्म पहले संपूर्ण धरती पर व्याप्त था। पहले धरती के सात द्वीप थे- जम्बू, प्लक्ष, शाल्मली, कुश, क्रौंच, शाक एवं पुष्कर। इसमें से जम्बूद्वीप सभी के बीचोबीच स्थित है। राजा प्रियव्रत संपूर्ण धरती के और राजा अग्नीन्ध्र सिर्फ जम्बूद्वीप के राजा थे। जम्बूद्वीप में नौ खंड हैं- इलावृत, भद्राश्व, किंपुरुष, भारत, हरि, केतुमाल, रम्यक, कुरु और हिरण्यमय। इसमें से भारतखंड को भारत वर्ष कहा जाता था। भारतवर्ष के ९ खंड हैं- इसमें इन्द्रद्वीप, कसेरु, ताम्रपर्ण, गभस्तिमान, नागद्वीप, सौम्य, गन्धर्व और वारुण तथा यह समुद्र से घिरा हुआ द्वीप उनमें नौवां है। भारतवर्ष के इतिहास को ही हिन्दू धर्म का इतिहास नहीं समझना चाहिए।

१२) ईस्वी सदी की शुरुआत में जब अखंड भारत से अलग दुनिया के अन्य हिस्सों में लोग पढ़ना-लिखना और सभ्य होना सीख रहे थे, तो दूसरीर ओर भारत में विक्रमादित्य, पाणीनी, चाणक्य जैसे विद्वान व्याकारण और अर्थशास्त्र की नई इमारत खड़ी कर रहे थे। इसके बाद आर्यभट्ट, वराहमिहिर जैसे विद्वान अंतरिक्ष की खाक छान रहे थे। वसुबंधु, धर्मपाल, सुविष्णु, असंग, धर्मकीर्ति, शांतारक्षिता, नागार्जुन, आर्यदेव, पद्मसंभव जैसे लोग उन विश्वविद्यालय में पढ़ते थे जो सिर्फ भारत में ही थे। तक्षशिला, विक्रमशिला, नालंदा आदि अनेक विश्व विद्यालयों में देश विदेश के लोग पढ़ने आते थे।

# जानवे म्हणजे काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जानवे हे हिंदू धर्मातील प्रत्येक पुरुष व्यक्तींच्या व्यवच्छेदक चिन्हांपैकी एक चिन्ह मानले जाते. जानवे किंवा यज्ञोपवीत तथा ब्रह्मसूत्र हे पुरुषाने शरीरावर परिधान करावयाचे हिंदू धर्मातील एक प्रतीक आहे. यज्ञाने पवित्र झालेले ते यज्ञोपवीत म्हणजे ‘जानवे’ अशी व्याख्या केली जाते.

जानवे हे कापसाच्या तंतूंनी तयार करतात. तीन सूत्रे एकत्र करून त्याचा एक पदर तयार करतात. असे तीन पदर एकत्र करून त्याचा एक पदर तयार करतात. असे तीन पदर एकत्र करून एक विशिष्ट गाठ(ब्रह्मगाठ) ‘ग्रंथी’ मारली म्हणजे जानवे तयार होते. अशा रीतीने जानव्यात एकून नऊ सूत्रे असतात. सुतावरून स्वर्ग गाठणे या मराठी म्हणीतील सूत (बासूत्र) ते हेच. त्याची लांबी ९६ अंगुळे असावी, असे सांगितले आहे. जानवे तयार करताना व धारण करताना विशिष्ट मंत्र म्हणतात, तो कोणता ते पुढे जाणून घेऊ. तसेच ते तयार झाल्यावर त्याच्यावर मंत्रपूर्वक संस्कार करतात. जानव्याचे मंत्रपूर्वक अभिमंत्रण केल्यावर ते सूर्याला दाखवितात आणि मगच धारण करतात.

यज्ञोपवितामध्ये तीन मुख्य पदर, प्रत्येक मुख्य पदरांचे तीन उपपदर आणि प्रत्येक उपपदराचे तीन सूक्ष्मतंतू असे नऊ पदर म्हणजेच तंतू असतात. जानव्यातील एकूण ९ तंतूंपैकी पहिल्या तंतूवर ओमकार असतो. दुसऱ्यावर अग्नी असतो. तिसऱ्यावर नवनाग असतो. चौथ्यावर सोम असतो. पाचव्यावर पितर असतो. सहाव्यावर प्रजापती असतो. सातव्यावर वायू असतो. आठव्यावर यम असतो. नवव्यावर विश्वदेव असतो. असे नऊ सूत्रींचे (तंतू) तीन पदर म्हणजेच सत्वरजतम हे तीन गुण. हे तीन गुण असलेल्या दोऱ्याच्या ९६ अंगुळे इतक्या लांब दोऱ्याचे जानवे बनलेले असावे.

**(जानवे ९६ बोटे लांब असावे, असा शास्त्रात उल्लेख आहे.)**

शहाण्णव चौंगे (एक चौंगा = चार अंगुळे) लांबी असलेल्या सूतास कोठेही न तोडता त्रिगुणीकरण करून त्यास ब्रह्मगाठ मारून यज्ञोपवीत अर्थात जानवे तयार केले जाते. जानव्यावर जी ‘ब्रह्मगाठ’ मारली असते, ती अद्वैताची गाठ म्हणजेच ‘जीव व ब्रह्म एकच आहे’ हा सिद्धांत. चार वेद, सहा शास्त्र व अठरा पुराणे ‘जिवो ब्रम्हैव ना पर’ हीच शिकवण देतात.

माऊली ज्ञानोबाराय या जानव्याला ज्ञानेश्वरीत नवरत्नाच्या हाराची उपमा देतात.

तो गुण नवरत्नाकारू यया नवरत्नाचा हारू न फेडितले दिनकरू प्रकाश जैसा ज्ञाने. यात सूत म्हणजेच सूक्ष्मतंतू हा मुख्य धागा होय. देवतान्यास करताना तंतू हाच शब्द वापरतात. तीन पदरांवर तीन वेद व



ब्रह्मगाठीवर अथर्ववेद असतो, अशी संकल्पना आहे. यज्ञोपवीतीतील तीन मुख्य पदर पुढील त्रयींचे प्रतिनिधित्व करतात. ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ हे तीन आश्रम; गार्हपत्य, दक्षिणाग्नी, आहवनीय हे तीन अग्नीसत्व, रज, तम हे तीन गुण पृथ्वी, अंतरीक्ष, दृह्यू हे तीन लोक

खांद्यापासून बेंबी किंवा कमरेपर्यंत साधारणपणे ३२ अंगुळे अशी येते.३ पदर गृहित धरून ती ९६ अंगुळे अशी व सलग धागा ( न तोडता ) पकडला तर ९६ चौंगे असे माप येते.

**जानव्याच्या सुताची लांबी ९६ चौंगे**

## हिंदू धर्मात एकूण १६ संस्कार आहेत. ते असे :

**१) भूमिका २) गर्भाधान संस्कार ३) पुंसाधन संसकार ४) सीमन्तोन्नयन ५) जातकर्म ६) नामकरण संस्कार (बारसे) ७) निष्क्रमण ८) अन्नप्राशन संस्कार (बोळव) ९) मुंडन/चूड़ाकर्म संस्कार (जावळ) १०) विद्यारंभ संस्कार ११) कर्णवेध संस्कार (कान टोचणे) १२) यज्ञोपवीत /उपनयन संस्कार (मुंज)१३) वेदारंभ संस्कार १४) देशात संस्थार १५) समावर्तन संस्कार १६) विवाह संस्कार**

**असण्यामागे काही कारणे आहेत, ती अशी – प्रथम कारण**

चतुर्वेदेषु गायत्री चतुर्विन्शत्येकाक्षरा ।
तस्मात् चतुर्गुणं कृत्वा ब्रह्मसुत्रं मदिरयेत् ॥

**म्हणजे–**

२४ अक्षरयुक्त गायत्री चारही वेदांमध्ये आलेली असल्यामुळे त्यानुसार ब्रह्मसुतांची लांबी (२४४=९६) ९६ असते.

**दुसरे कारण म्हणजे**

तिथी वार च नक्षत्र तत्ववेद गुणान्वितम् ।
कालत्रयम् च मासाश्च ब्रह्मसूत्र हि षण्णाव ॥

**म्हणजे –**

४ वेद (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद )+ ३ काळ +२५ तत्त्वे (प्रकृती, पुरुष, महतत्त्व, अंहकार, पंच महाभुते, पंच विषय, पंच ज्ञानेंद्रिय, पचं कर्मेंद्रिय, मन) +३ गुण ( सत्त्व, रज, तम ) + १५ तिथी +७ वार +२७ नक्षत्रे +१२ महिने = ९६;

या सर्वांच्या बेरजेनुसार लांबी ९६ येते.

**तिसरे कारण म्हणजे**

सामुद्रिक शास्त्रात पुरुषाचे प्रमाण स्वतःच्या अंगुलांनी ८४ ते १०८ पर्यंत असते. त्याची सरासरी ९६ अंगुळे येते.

अन्त्येष्टि संस्कार आणि श्राद्ध संस्कार यातील एका संस्कारात जानव्याचा उल्लेख केलेला आढळतो.पण, वर्णन केलेला उपनयन संस्कार / मौंज म्हणजे नेमके काय?

गुरूंच्या जवळ जाणे म्हणजे उपनयन. यालाच मुंज, मौंज, व्रतबंध किंवा मौंजीबंधन असेही म्हणतात. गुरूंच्या जवळ राहून ब्रह्मचारी म्हणून चांगल्या प्रकारे, एकाग्र चित्ताने अभ्यास करण्यासाठी काही नियम पाळणे आवश्यक असते. त्या नियमांनी व व्रतांनी स्वतःला बांधून घेणे म्हणजेच व्रतबंध होय. ही व्रते नियमाने पाळण्यासाठी निश्चयशक्तीची जोडही त्याला द्यावी लागते. पहिला जन्म आई-बाबांपासून आणि दुसरा जन्म गायत्री मंत्रापसून आणि आचार्य यांच्यामुळे प्राप्त होतो, असे या संस्काराचे महत्त्व वेदांत वर्णिलेले आहे.

# आर्थिक समस्यांनी त्रस्त आहात? घरात लावा ही ५ झाडे

## सुख-समृद्धी नांदेल घरात...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अनेकदा आपण कितीही अहोरात्र मेहनत केली तरी घरात पैशांची कायम चणचण भासते किंवा हातात आलेला पैसा अजिबात टिकत नाही. अशा निराशाजनक वेळी घरातील अदृश्य नकारात्मक ऊर्जा या सर्व समस्यांना कारणीभूत असू शकते. जगभरात प्रसिद्ध असलेल्या चिनी वास्तुशास्त्र म्हणजेच फेंगशुई मध्ये घरातील हेच गंभीर वास्तुदोष दूर करण्यासाठी आणि जीवनात पुन्हा सकारात्मकता वाढवण्यासाठी अनेक अत्यंत सोपे उपाय सविस्तरपणे सांगण्यात आले आहेत. फेंगशुईच्या प्रभावी मदतीने आपण केवळ आपल्या घराला एक अत्यंत सुंदर आणि आकर्षक रूप देऊ शकत नाही, तर घरातील संपूर्ण वातावरण नेहमी आनंदी आणि सकारात्मक ऊर्जेने परिपूर्ण ठेवू शकतो. आज आपण अशा काही विशेष आणि लाभदायी रोपांबद्दल माहिती घेणार आहोत, जी घराच्या योग्य कोपऱ्यात लावल्याने तुमच्या आर्थिक प्रगतीचे बंद झालेले मार्ग पुन्हा नव्याने खुले होऊ शकतात.



जर तुम्ही गेल्या अनेक दिवसांपासून पैशांची कमतरता किंवा वारंवार उद्भवणाऱ्या आर्थिक अडचणींमुळे हैराण असाल, तर घरात जेड प्लांट लावणे तुमच्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरू शकते. या विशिष्ट रोपाच्या घरात उपस्थितीमुळे घरातील सर्व प्रकारची हानिकारक नकारात्मक ऊर्जा हळूहळू नष्ट होते आणि सुख-समृद्धीला मोठी चालना मिळते. या महत्त्वपूर्ण रोपासोबतच मानसिक शांती आणि घरात कायम आनंदाचे व उत्साहाचे वातावरण टिकवून ठेवायचे असल्यास पीस लिली प्लांट हा एक अतिशय उत्तम आणि सुंदर पर्याय आहे. हे शांतताप्रिय रोप तुम्ही तुमचे घर किंवा ऑफिसमध्ये कुठेही सहज लावू शकता. असे प्रामुख्याने मानले जाते की, या विशेष रोपामुळे तुमच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक प्रगतीचे नवे मार्ग वेगाने खुले होतात आणि संपूर्ण कुटुंबात कायम समाधान आणि एकोपा राहतो.

या दोन रोपांशिवाय घरामध्ये बांबूचे झाड लावणे हे देखील फेंगशुईनुसार अत्यंत शुभ आणि भाग्यवान मानले गेले आहे. वास्तुशास्त्राच्या नियमांनुसार घराच्या पूर्व दिशेला बांबूचे रोप योग्य पद्धतीने ठेवल्यास घरातील सर्व सदस्यांची मोठी भरभराट होते. हे लहानसे रोप घरामध्ये सकारात्मक ऊर्जेचा सतत आणि अखंड संचार करत असते, ज्यामुळे घरातील वातावरण नेहमी प्रफुल्लित राहते आणि कुटुंबाला अपेक्षित आर्थिक स्थैर्य प्राप्त होण्यास मोठी मदत मिळते.

या सर्व चिनी उपायां व्यतिरिक्त आपल्या हिंदू धर्मात तुळशीचे रोप अत्यंत पवित्र आणि साक्षात माता लक्ष्मी चे साक्षात रूप मानले गेले आहे. स्वतःच्या अंगणात किंवा बाल्कनीत हिरवीगार तुळस लावून तिच्यासमोर दररोज संध्याकाळी साजूक तुपाचा दिवा न चुकता लावल्यास घरात कधीही पैशांची कमी भासत नाही आणि कुटुंबाची आर्थिक स्थिती अधिक भक्कम राहते. तसेच स्वतःचे झोपलेले नशीब उजळवण्यासाठी आणि जीवनात गुड लक आकर्षित करण्यासाठी मनी प्लांट हे रोप घराघरात सर्वात जास्त लोकप्रिय आहे. हे पैशांचे रोप नेहमी घराच्या उत्तर दिशेला एका निळ्या रंगाच्या बाटलीत किंवा पूर्णपणे पारदर्शक फुलदाणीतच लावावे. मात्र, हे रोप लावताना एक गोष्ट कायम लक्षात ठेवावी की मनी प्लांटच्या वेली चुकूनही जमिनीच्या दिशेने खाली लोंबकळत राहू नयेत, त्या नेहमी आकाशाच्या दिशेने वर वाढल्या पाहिजेत.

थोडक्यात सांगायचे तर निसर्गाचा योग्य समतोल आणि माणसाचे सकारात्मक विचार या दोन्ही गोष्टी कोणत्याही व्यक्तीच्या प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक असतात. घरातील वास्तू नियमांचे पालन करून या विशेष रोपांच्या लागवडीसोबतच आपले प्रामाणिक प्रयत्न आणि मेहनत कायम ठेवल्यास यश नक्कीच पदरात पडते.

# चुकूनही ‘या’ चार गोष्टींना पाय लागल्यास लगेच मागावी माफी


## काय सांगते चाणक्य नीती ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

माणसाची खरी ओळख केवळ त्याने केलेल्या मोठ्या आणि महान कार्यांवरून होत नाही, तर त्याचे विचार, आचरण आणि संस्कार यावरूनही होते. जीवन अधिक सुंदर आणि अर्थपूर्ण बनविण्यासाठी आचार्य चाणक्य यांनी त्यांच्या नीतिशास्त्रामध्ये अनेक मोलाचे सल्ले दिले आहेत. आपल्या भारतीय परंपरेत आणि संस्कृतीत काही विशिष्ट गोष्टींना तसेच व्यक्तींना अत्यंत आदराचे स्थान दिले गेले आहे. जर अनावधानाने किंवा चुकून या गोष्टींना आपला पाय लागला, तर त्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नये, असे चाणक्य नीतीमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत त्वरित हात जोडून किंवा मनोमन माफी मागितली पाहिजे. असे केल्याने समोरच्या व्यक्तीबद्दल किंवा गोष्टीबद्दल आपला आदर कायम राहतो आणि आपल्यावर कोणतेही पाप लागत नाही. आचार्य चाणक्य यांनी प्रामुख्याने चार अशा गोष्टी सांगितल्या आहेत, ज्यांना पाय लागल्यास माणसाने क्षणाचाही विलंब न लावता क्षमा मागितली पाहिजे.

सर्वांत पहिली आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे अग्नी. आपल्या संस्कृतीत अग्नीला साक्षात देवतेचे रूप मानले जाते. घरातील कोणतीही पूजा, हवन किंवा इतर कोणतेही शुभ कार्य अग्नीशिवाय नेहमीच अपूर्ण मानले जाते. त्यामुळे जर पूजेच्या वेळी एखाद्या दिव्याला, हवन कुंडाला किंवा घरातील चुलीला चुकून पाय लागला, तर त्वरित हात जोडून माफी मागणे अत्यंत आवश्यक आहे. अग्नीच्या बाबतीत कधीही कोणताही निष्काळजीपणा दाखवू नये. ज्या घरामध्ये अग्नीचा योग्य सन्मान केला जातो, तिथे नेहमी सुख, शांती आणि समृद्धी नांदते.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे घरातील वडीलधारे आणि गुरु. आपल्यापेक्षा मोठ्यांचा नेहमी आदर करावा, ही शिकवण आपल्याला लहानपणापासूनच दिली जाते. गुरुजनांचा आणि मोठ्यांचा सन्मान करणे हा आपल्या महान संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. हे लोक त्यांच्या आयुष्यातील अनुभव आणि अफाट



ज्ञानाच्या जोरावर आपल्याला नेहमी योग्य मार्ग दाखवत असतात. जर कधी चुकून या आदरणीय व्यक्तींना आपला पाय लागला, तर लगेच त्यांची माफी मागून त्यांचे आशीर्वाद घेतले पाहिजेत. जे लोक मोठ्यांचा आणि गुरुजनांचा नेहमी आदर करतात, त्यांच्या आयुष्यात मान-सन्मानाची कधीच कमतरता भासत नाही आणि त्यांना प्रत्येक पावलावर मोठे यश मिळते.

तिसरी गोष्ट म्हणजे गाय. सनातन हिंदू परंपरेत गाईला नेहमीच मातेचा सर्वोच्च दर्जा दिला गेला आहे. त्यामुळे जर कधी रस्त्याने चालताना किंवा इतर कोणत्याही वेळी गाईला चुकून पाय लागला, तर थोडाही उशीर न करता तिची माफी मागितली पाहिजे. असे केल्याने आपल्या हातून घडलेल्या चुकीचे पाप आपल्याला लागत नाही आणि मनालाही समाधान मिळते.

चौथी आणि शेवटची गोष्ट म्हणजे लहान कन्या. लहान मुलींना साक्षात देवीचे रूप मानले जाते. त्यामुळे जर अनावधानाने एखाद्या लहान कन्येला आपला पाय लागला, तर आपण पापाचे वाटेकरी होतो, अशी मान्यता आहे. अशा परिस्थितीत कोणत्याही लहान मुलीला पाय लागल्यास त्वरित तिचे पाय पडून माफी मागायला हवी.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)